पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६३ वा | शनिवार, दि. ३० मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# विखे गृहपाठ करुन गेले तरीही फेल झाले !

## मॅरेथॉन चर्चेनंतरही तोडगा नाहीच; मनोज जरांगे उपोषणावर ठाम

## ज्या 58 लाख नोंदी सापडल्या आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या

### मराठ्यांसाठी वेगळं मंत्रालय स्थापन करा

**अंतरवली (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील अंतरवालीत जाण्याआधी गृहपाठ करून गेले. विभागीय आयुक्तालयात बैठक घेऊन आकडेवारी, मराठा आरक्षणा संदर्भात सरकारने घेतलेले निर्णय, सुरू असलेली कामे या सगळ्यांची जंत्री सोबत नेली.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याशी विखे पाटील, आमदार प्रसाद लाड यांची मॅरेथॉन चर्चाही झाली. सरकारचे म्हणणे ऐकून घेतल्यावर मनोज जरांगे पाटील यांनी आपण उपोषणावर ठाम असल्याचे सांगत विखे पाटील-प्रसाद लाड यांच्या शिष्टमंडळाला रिकाम्या हाताने पाठवले.

राज्य सरकारने शिंदे समिती स्थापन झाल्यापासून सापडलेल्या 58 लाख नोंदीची यादी जाहीर करा, सगळ्यांना प्रमाणपत्र द्या. मराठ्यांसाठी स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन करा, हैदराबाद गॅझेटप्रमाणेच सातारा गॅझेटचा जीआर काढा, नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देणार हे लेखी द्या, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी विखे पाटील यांच्याकडे केली. मराठा समाजासाठी तुम्हाला जेवढं शक्य आहे तेवढं करा, मी आंदोलन करणारच, असे सांगत या चर्चेचा शेवट झाला.

मराठा आरक्षण, कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप, मराठा आंदोलकांवर दाखल गुन्हे मागे घेणे, आंदोलनात बलिदान देणाऱ्या तरुणांच्या कुटुंबाला आर्थिक मदत, एका सदस्याला नोकरी यासह विविध मागण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी उद्या, 30 मे पासून बेमुदत उपोषणाची घोषणा केली होती. त्यावर आज सरकारचे शिष्टमंडळ भेटून गेल्यानंतरही जरांगे पाटील हे ठाम आहेत.

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला, पण सातारा गॅझेटचा जीआर अद्याप काढला नाही. सरकारने कुणबीच्या 58 लाख नोंदी सापडल्याचं सांगितलं होतं, मग त्यांना अद्याप प्रमाणपत्रं का दिली नाहीत? राज्यात ज्या 58 लाख कुणबी नोंदी मिळाल्या आहेत त्यांची यादी द्या. त्या 58 लाखांपैकी किती जणांना कुणबी प्रमाणपत्र दिली याची माहिती द्या, अशी मागणी जरांगे पाटील यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली.

मराठवाड्यात ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देऊ नका, असे आदेश मुख्यमंत्री कार्यालयातून आले असल्याचा आरोप जरांगे यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढे जाण्याचे कुणीचं धाडस करत नाही. त्यामुळे त्यांनी हैदराबाद गॅझेट लागू करा असा आदेश द्यावा. उद्या सकाळपासून कुणबी प्रमाणपत्राचं वाटप होईल असे सांगत जरांगे पाटील यांनी लेखी आदेश काढण्याचा आग्रह धरला.

यावर विखे पाटील यांनी राज्यात आतापर्यंत 39 लाख कुणबी प्रमाणपत्र वाटप केल्याचे सांगत यादी देण्याची तयारी दाखवली. सरकार अतिशय प्रामाणिकपणे काम करत आहे. ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांची गावनिहाय, जिल्हानिहाय माहिती देतो. आपल्या विश्वासाला तडा देऊ जाणार नाही. 1994 मध्ये त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी चूक केली, मराठा समाजाला ओबीसीमध्ये घातले नाही, असेही ते म्हणाले.

सातारा गॅझेटचा प्रस्ताव तयार झाला आहे. पण आगोदर हैदराबाद गॅझेटच्या विरोधात न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्याला स्थगिती मिळाली आहे. त्यामुळे आता लगेच सातारा गॅझेट आणले तर त्यालाही स्थगिती मिळू शकेल अशी भीती आहे, विखे पाटलांनी व्यक्त केली. नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया थांबवणार नाही, हैदराबाद आणि सातारा गॅझेटची अंमलबजावणी करणार असे लेखी द्या, या मागणीचा पुनरुच्चार जरांगे पाटील यांनी त्यानंतर केली.

**अन जरांगे पाटील संतापले.. :** महाराष्ट्रात कुणबी म्हणून मिळालेल्या नोंदी आणि वितरित केलेले दाखले याच्यात तफावत असल्याने आणि अधिकारी संभ्रमित करणारी माहिती देत असल्याने मनोज जरांगे पाटील चांगलेच संतापले. मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी न्यायमूर्ती शिंदे यांच्याशी जरांगे पाटलांचे बोलणे करून दिले. मात्र न्यायमूर्ती शिंदे यांच्या बोलण्याने जरांगे पाटील यांचे समाधान झाले नाही. असले कुठे न्यायमूर्ती असतात काय? असे संतापाने म्हणत तुमचे आणि आमचे जमणार नाही, तुम्ही सुखरूप परतीचा प्रवास करा मी आंदोलन करणारच, असे जरांगे पाटील यांनी विखे-लाड यांना स्पष्ट सांगीतले. त्यानंतर वातावरण गंभीर झाले होते.



#### विखेंनी दिली आकडेवारी..

जरांगे पाटील यांच्या मागण्यांविषयी चर्चा करण्यासाठी आलेल्या राधाकृष्ण विखे पाटील यांनी जरांगे पाटील यांनी आकडेवारीचे कागदच ठेवले. अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे प्रमाणपत्र द्यायला उशीर झाल्याची कबुली देतानाच त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान दाखल 668 पैकी आपण 557 गुन्हे मागे घेतले आहेत. आणखी 191 गंभीर स्वरुपाचे गुन्हे न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यातील काही कलम कमी करता येतील का? यासंदर्भात न्याय विभागाशी चर्चा करणार असल्याचे विखे पाटील यांनी सांगीतले. 90 टक्के गुन्हे आपण मागे घेतले आहेत.

आंदोलनात बलिदान दिलेल्यांच्या 269 कुटुंबांना सानुग्रह अनुदान देण्याचे काम पूर्ण झालेले आहे. त्यांना नोकरी देण्याचा मुद्दा होता. काही लोकांना परिवहन महामंडळात नोकऱ्या मिळाल्या, पण काहींनी त्या नाकारल्या. जरांगें पाटलांच्या मागण्याच्या शासन आदर करत आहे. शिंदे समिती स्थापन झाल्यापासून मराठवाड्यात 49 हजार 78 नोंदी आढळून आल्या आहेत. तर राज्यामध्ये 12 लाख 96 हजार दाखले वितरित करण्यात आले आहेत. 3 लाख 251 अर्ज मराठवाड्यात वितरीत झाले आहेत. हैदराबाद गॅजेटिअनुसार राज्यभरात 61 हजार प्रमाणपत्र दिल्याची माहितीही जरांगे पाटील यांना विखे पाटलांनी दिली.

## सोलापूरातील ७०१ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाची सोडत १२ जूनला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील मुदत संपलेल्या (२०२४ व २०२५) तसेच २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून, ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत येत्या १२ जून रोजी काढण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील १ हजार २७ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ७०१ ग्रामपंचायतींचा या प्रक्रियेत समावेश आहे.

आरक्षण प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील राजकारण ढवळून निघण्याची चिन्हे आहेत. सरपंचांची निवड थेट जनतेतून होणार असली, तरी गावपातळीवर




पॅनेल राजकारणाला अद्याप महत्त्व आहे. कोणत्या प्रभागात कोणते आरक्षण लागू होणार आणि कोणत्या कार्यकर्त्याला संधी मिळणार, याकडे गावपुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा प्रशासनाने प्रभागरचना अंतिम केली असून, आरक्षण प्रक्रिया १० जुलैपर्यंत पूर्ण होणार आहे. त्यानंतर मतदार यादी विभाजनाचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दिवाळीच्या सुमारास ग्रामपंचायत निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**...असे आहे आरक्षण सोडतीचे वेळापत्रक**

- ८ जून : ग्रामसभेची अधिसूचना प्रसिद्ध
- १२ जून : विशेष ग्रामसभा व आरक्षण सोडत
- १९ जून : प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण प्रसिद्ध
- १९ ते २५ जून : हरकती व सूचना नोंदविण्याची मुदत
- ३ जुलै : हरकतींवर प्रांताधिकाऱ्यांचा अभिप्राय
- १० जुलै : अंतिम प्रभाग आरक्षण प्रसिद्ध

## ऊस बिलासाठी 'रणसंग्राम', तोडगा निघेना; पाचव्या दिवशीही शेतकऱ्यांचे उपोषण सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूरतालुक्यातील धोत्री येथील गोकुळ साखर कारखान्याकडे तब्बल 130 कोटी रुपयांचे ऊस बिल थकीत असल्याने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेले शेतकऱ्यांचे बेमुदत उपोषण शुक्रवारी पाचव्या दिवशीही कायम राहिले. अद्याप कोणताही ठोस तोडगा न निघाल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.



शेतकऱ्यांच्या आंदोलनाची दखल घेत दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी शेतकरी प्रतिनिधी व कारखाना प्रशासनासोबत बैठक घेतली. यावेळी कारखान्याकडून ऊस बिलासाठी वेळ मागण्यात आला. तर नियमानुसार आरआरसी कारवाई करून शेतकऱ्यांची रक्कम मिळवून देण्यासाठी सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागू शकतो, अशी भूमिका प्रशासनाने मांडली. मात्र "जोपर्यंत खात्यावर पैसे जमा होत नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही," असा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

आंदोलनस्थळीच शेतकऱ्यांनी चूल पेटवत डाळ-भात शिजवून उदरनिर्वाह सुरू केला आहे. "ऊस बिल मिळेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच डाळ-भात शिजवून खाऊ," अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाने कारखान्यावर जप्तीचे आदेश काढल्याची माहिती समोर आली आहे. तरीही प्रत्यक्ष रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचे आंदोलनकर्ते अमोल पाटील यांनी सांगितले.

शुक्रवारी आमदार प्रवीण स्वामी यांनी आंदोलनस्थळी भेट देत शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकरी संघटनांचे पदाधिकारी तसेच अरविंद घोडके, अंबादास शिवशंकर, सचिन जवळगे, प्रशांत सुरवसे, गणेश नरे यांच्यासह तीस गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'कारखान्याचा लिलाव होईना; कारखानदार बिलही देईना'**

ऊस बिलाच्या रकमेकरिता सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी मागील पाच दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करत आहेत. मात्र ना कारखान्याकडून पैसे मिळत आहेत, ना प्रशासनाकडून ठोस कारवाई होत आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून त्यांच्या संतापात दिवसेंदिवस भर पडत आहे.

**प्रवीण स्वामींची आंदोलन स्थळाला भेट**

सोलापूर जिल्हा अधिकारी कार्यालयापुढे गोकुळ शुगर कारखान्याने ऊस बिल थकवल्याविरोधात गेली पाच दिवसापासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्याकरिता व शेतकऱ्यांशी चर्चा करण्याकरिता शुक्रवारी उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी यांनी आंदोलन स्थळी भेट देत शेतकऱ्यांसमवेत चर्चा करत सोलापूरचे जिल्हाधिकारी, तहसीलदार जमदाडे, गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे यांना फोन द्वारे चर्चा केल्याचे आंदोलन शेतकरी सांगितले.

## अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेची कारवाई

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अनधिकृत बांधकामांवर सुरू असलेल्या कारवाई अंतर्गत आयुक्त मा.डॉ सचिन ओम्बासे यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. दिनांक 29/05/2026 रोजी आयुक्त यांनी 29 नवी पेठ येथील सुरतवाला यांच्या जागेवरील तसेच शुक्रवार पेठ येथील जवाहर मोतीलाल शहा यांच्या C.S. No. 3994/क-2 या ठिकाणावरील अनधिकृत बांधकाम पाडकाम कारवाईची पाहणी केली.

यावेळी संबंधित ठिकाणी सुरू असलेल्या कारवाईचा



आढावा घेण्यात आला तसेच अनधिकृत बांधकामांबाबत महानगरपालिकेच्या धोरणानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. शहरातील नियमबाह्य बांधकामांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असून अशा प्रकारांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही, असेही मा. आयुक्तांनी यावेळी सांगितले.

सदर पाहणीवेळी निळकंठ मठपती व आनंद जोशी हे उपस्थित होते. तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी देखील उपस्थित राहून कारवाईची माहिती देत होते.

महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अनधिकृत बांधकामांवर सातत्याने कारवाई सुरू राहणार असून नागरिकांनी बांधकाम करताना महानगरपालिकेची आवश्यक परवानगी घेऊनच काम करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## हॉस्पिटलच्या बिलावर प्रश्न विचारा; नागरिकांनी जागरूक होण्याची गरज

### आरोग्य व्यवस्थेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची मागणी वाढली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आजारपणाच्या काळात रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांची मानसिक व आर्थिक अवस्था अत्यंत नाजूक असते. अशा परिस्थितीत अनेक खासगी रुग्णालयांकडून आकारले जाणारे अवाजवी आणि गोंधळात टाकणारे बिल हा गंभीर चिंतेचा विषय बनत चालला आहे. 'हॉस्पिटलचं बिल मोठं आलं म्हणून ते अंतिम सत्य मानून शांत बसू नका,' असे स्पष्ट आवाहन सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकता, जबाबदारी आणि नागरिकांच्या हक्कांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

विजय कुंभार यांनी नागरिकांना आवाहन करताना म्हटले आहे की, रुग्णालयाकडून दिलेल्या प्रत्येक बिलातील चार्ज समजून घेणे हा रुग्ण आणि नातेवाईकांचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्या उपचारासाठी किती शुल्क आकारले गेले, कोणत्या सेवांचा समावेश आहे, औषधांचे दर काय आहेत, तपासण्यांचे शुल्क कशाच्या आधारावर निश्चित करण्यात आले आहे, याची लेखी माहिती मागणे आवश्यक आहे. अनेकदा रुग्णालय प्रशासनाकडून केवळ अंतिम रक्कम दिली जाते; मात्र त्यामागील तपशील स्पष्ट केला जात नाही. त्यामुळे सामान्य नागरिक आर्थिकदृष्ट्या अडचणीत येतात.

## पुढील २-३ दिवसांत मान्सून केरळात धडकणार

### जळगावसह महाराष्ट्रात हवामान बदलाचे संकेत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात भीषण उष्णता आणि उकाड्याने नागरिक हैराण झाले असतानाच आता एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. मान्सूनची प्रतीक्षा लवकरच संपणार असून पुढील २ ते ३ दिवसांत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची दाट शक्यता हवामान विभागाने (IMD) वर्तवली आहे.

अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनच्या प्रगतीसाठी अत्यंत अनुकूल वातावरण तयार होत आहे. दरम्यान पुढील ५ दिवस राज्यात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून जळगाव जिल्ह्यामध्येही हवामानात बदल होण्याची चिन्हे आहेत.

मान्सूनचा प्रवास कालपर्यंत लक्षद्वीपपर्यंत पोहोचला होता. मात्र आज त्याची पुढील वाटचाल थोडी मंदावली. तरीदेखील अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनसाठी अनुकूल वातावरण तयार झाले असून पुढील २ ते ३ दिवसांत तो आणखी पुढे सरकण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. महाराष्ट्रात जूनच्या दुसऱ्या आठवड्यात किनारपट्टीवर पावसाचा जोर थोडा वाढू शकेल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तसेच मुंबईत मान्सून दाखल होण्याची



सरासरी तारीख ११ जून आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आज विदभार्तील वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांत उष्ण लाट आहे. दरम्यान, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये पुढील पाच दिवस ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. काही भागांत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता देखील व्यक्त करण्यात आली आहे.

मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यांमध्येही हवामानात बदल होण्याची चिन्हे आहेत. तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## जमिनीच्या वादातून ६ जणांची गोळ्या झाडून निर्घृण हत्या; संपूर्ण परिसर हादरला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विजयपूर जिल्ह्यातील चडचण तालुक्यातील गोविंदपूर गाव शुक्रवारी सायंकाळी अचानक गोळीबाराच्या आवाजाने दणाणून गेले आणि काही क्षणांतच सहा निष्पाप जीव रक्ताच्या थारोळ्यात कोसळले.

जमिनीच्या जुन्या वादातून घडलेल्या या भीषण सामूहिक हत्याकांडामुळे संपूर्ण भिमातीर परिसर हादरून गेला असून गावात भीती, तणाव आणि हळहळ व्यक्त होत आहे.

गोविंदपूर येथील निराळे आणि गुळगी (गोलगी) कुटुंबांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून जमिनीच्या कारणावरून वाद सुरू होता. हा वाद मिटण्याऐवजी अधिक चिघळत गेला आणि अखेर शुक्रवारी त्याचे रूप थेट रक्तरंजित संघर्षात बदलले. सायंकाळच्या सुमारास काही अज्ञात हल्लेखोर गावात दाखल झाले आणि त्यांनी थेट अंदाधुंद गोळीबार सुरू केला. अचानक झालेल्या या हल्ल्याने गावात एकच गोंधळ उडाला. नागरिक जीव वाचवण्यासाठी घरांकडे धावू लागले.




या अमानुष गोळीबारात रेवणसिद्धप्पा निराळे, दुंडप्पा निराळे, शिवपुत्र निराळे, चंद्रशेखर निराळे आणि शब्बीर अत्तार यांच्यासह आणखी एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. अनेक कुटुंबांचे आधारवड एका क्षणात कोसळल्याने गावात शोककळा पसरली आहे. मृतांच्या नातेवाईकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी, गुन्हे शाखेची पथके आणि मोठा पोलीस बंदोबस्त तात्काळ घटनास्थळी दाखल झाला. संपूर्ण गाव पोलिसांनी छावणीत रूपांतरित केले असून तणावपूर्ण शांतता कायम आहे. हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथके रवाना करण्यात आली आहेत. सीमाभागात नाकाबंदी करून संशयितांची कसून तपासणी सुरू करण्यात आली आहे.

या रक्तरंजित घटनेमुळे विजयपूर जिल्ह्यासह सोलापूर सीमाभागातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जमिनीचा वाद इतका विकोपाला जाऊन सहा जीवांचा बळी जाईल, याची कल्पनाही नव्हती, अशी भावना गावकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, या घटनेने संपूर्ण चडचण तालुका सुन्न झाला असून गावात भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## संपादकीय

# परीक्षा व्यवस्थापनासाठी लष्कराची गरज एवढे 'अच्छे दिन' आणणारे...

देशाच्या शिक्षण व्यवस्थेचा पाया म्हणजे विश्वासार्ह परीक्षा पद्धती. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे मूल्यमापन निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने झाले पाहिजे, ही कोणत्याही लोकशाही व्यवस्थेची प्राथमिक अपेक्षा असते. मात्र गेल्या काही वर्षांत भारतातील विविध स्पर्धा परीक्षा, भरती परीक्षा आणि शैक्षणिक प्रवेश परीक्षा या सातत्याने पेपरफुटी, गैरव्यवहार, कॉपी, तांत्रिक गोंधळ आणि भ्रष्टाचाराच्या भोवऱ्यात अडकताना दिसत आहेत. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की काही राज्यांमध्ये परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी लष्कर किंवा निमलष्करी दलांची मदत घेण्याची वेळ प्रशासनावर आली. ही केवळ प्रशासनाची अपयशकथा नाही, तर देशाच्या शिक्षण आणि रोजगार व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणारी धोक्याची घंटा आहे. एकीकडे देशाला 'अच्छे दिन' आल्याचा दावा केला जातो, डिजिटल इंडिया, न्यू इंडिया, विश्वगुरू भारत अशा मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; पण दुसरीकडे साधी परीक्षा प्रामाणिकपणे घेण्यासाठी सरकारला लष्कराची मदत घ्यावी लागत असेल, तर हा नेमका विकास कोणासाठी आणि कशाचा, असा सवाल निर्माण होतो. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित परीक्षा सुरक्षित ठेवण्यात जर सरकार अपयशी ठरत असेल, तर ते शासनाच्या प्राधान्यक्रमावर गंभीर प्रश्न उपस्थित करणारे आहे.

पेपरफुटी हा आता अपवाद राहिलेला नाही; तो जणू व्यवस्थेचा भाग बनत चालला आहे. NEET, JEE, पोलीस भरती, शिक्षक भरती, तलाठी भरती, लिपिक भरती अशा अनेक परीक्षा वादाच्या भोवऱ्यात सापडल्या. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात, पालक कर्ज काढून कोचिंग फी भरतात, आणि शेवटी पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द होते किंवा न्यायालयीन लढाईत अडकते. या सगळ्याचा मानसिक, आर्थिक आणि सामाजिक फटका विद्यार्थ्यांना बसतो. पण जबाबदार कोण, याचे उत्तर मात्र मिळत नाही.

लष्कर हे देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी आहे, परीक्षा केंद्रांवर बंदोबस्त करण्यासाठी नव्हे. जेव्हा नागरी प्रशासन स्वतःच्या यंत्रणेवर विश्वास ठेवू शकत नाही, तेव्हा लष्कराला पाचारण करण्याची वेळ येते. हे प्रशासनातील अपयशाचे जिवंत उदाहरण आहे. एका सक्षम आणि सुशासित व्यवस्थेत परीक्षा घेण्यासाठी इतकी असामान्य पावले उचलावी लागणे, हे लोकशाही व्यवस्थेसाठी लाजिरवाणे आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे भ्रष्टाचार आणि राजकीय हस्तक्षेपामुळे अनेक परीक्षा प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात अडकल्या आहेत. काही ठिकाणी प्रश्नपत्रिका विक्रीचे रॅकेट उघडकीस आले, तर काही ठिकाणी गुण वाढवून देण्याचे प्रकार समोर आले. ही परिस्थिती केवळ विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारी नाही, तर देशातील गुणवत्ताधारित व्यवस्थेलाच कमकुवत करणारी आहे. मेहनतीने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य निर्माण होत आहे. 'अभ्यासापेक्षा ओळखी आणि पैसे महत्त्वाचे' असा धोकादायक संदेश समाजात जात आहे.

सरकारने आता केवळ घोषणाबाजी न करता कठोर आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे. परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी तांत्रिक सुधारणा, स्वतंत्र देखरेख यंत्रणा, पेपरफुटीविरोधी कठोर कायदे आणि दोषींवर जलद कारवाई आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी संबंधित प्रश्नांकडे केवळ राजकीय दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही.

देशातील तरुणाई ही भारताची सर्वात मोठी ताकद मानली जाते. पण त्याच तरुणाईच्या भविष्याचा पाया असलेल्या परीक्षा जर सुरक्षित राहू शकत नसतील, तर 'अच्छे दिन'च्या घोषणांपेक्षा वास्तव अधिक भयावह असल्याचे स्पष्ट होते. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी लष्कराची मदत घ्यावी लागणे, ही केवळ व्यवस्थेची चूक नाही; तर ती शासनाच्या कार्यक्षमतेवर लागलेली गंभीर शंका आहे. विद्यार्थ्यांना आश्वासन नव्हे, तर विश्वास हवा आहे आणि तो विश्वास पुन्हा निर्माण करण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांचीच आहे.

# अहिल्यादेवी होळकर : समाजकल्याणाची दीपस्तंभ

भारतीय इतिहासात अनेक पराक्रमी राजे, दूरदृष्टी असलेले प्रशासक आणि लोकहितासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्ती होऊन गेल्या; परंतु जनतेच्या मनावर मातृत्वाच्या भावनेने अधिराज्य गाजविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. ३१ मे हा दिवस त्यांच्या जयंतीदिनाच्या रूपाने संपूर्ण देशात आदराने साजरा केला जातो. मराठेशाहीच्या इतिहासात प्रशासन, न्याय, समाजकारण आणि लोककल्याण यांचा अद्भुत संगम घडवून आणणाऱ्या अहिल्यादेवी या केवळ एका संस्थानाच्या राणी नव्हत्या, तर त्या लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या एक संवेदनशील माता होत्या. त्यांचे संपूर्ण जीवन हे कर्तव्य, त्याग, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेचा आदर्श मानले जाते. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही समाजजीवनावर जाणवतो. स्त्रीशक्तीचे एक प्रभावी प्रतीक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. समाजातील दुर्बल घटकांना आधार देत न्याय आणि सुशासनाचा आदर्श उभा करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिमत्त्व जितके प्रेरणादायी आहे तितकेच अभ्यासपूर्ण देखील आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या अहिल्यादेवींना बालपणापासूनच संस्कार, कष्ट आणि समाजकल्याणाचे शिक्षण मिळाले. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची परंपरा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात संवेदनशीलता, विचारशीलता आणि निर्णयक्षमता विकसित झाली. बालपणापासूनच त्यांना ग्रंथांचे वाचन, लोकांशी प्रेमाने वागणे आणि संकटात धैर्य राखणे यांचे संस्कार मिळाले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण होते.

एक प्रसंग त्यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारा ठरला. मराठा साम्राज्यातील पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर हे पुण्याकडे जात असताना चौंडी येथे थांबले होते. त्या वेळी त्यांनी मंदिरात भक्तिभावाने पूजा करणाऱ्या अहिल्याबाईंचे दर्शन घेतले. त्यांच्या शांत, संयमी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन मल्हाररावांनी आपला पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला. अल्पवयातच त्यांचा विवाह इंदूरच्या होळकर घराण्यात झाला आणि त्या होळकर घराण्याच्या सून बनल्या. विवाहानंतर त्यांनी केवळ राजघराण्याच्या परंपरा जपल्या नाहीत, तर प्रशासन आणि लोककल्याणाची जाणही आत्मसात केली.

मल्हारराव होळकर हे पराक्रमी, दूरदृष्टी असलेले आणि अनुभवी प्रशासक होते. त्यांनी अहिल्यादेवींना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले. युद्धनीती, न्यायदान, आर्थिक व्यवहार, प्रजेच्या अडचणी आणि प्रशासनातील बारकावे यांचे ज्ञान त्यांनी अहिल्यादेवींना दिले. त्या काळात स्त्रियांना राज्यकारभारात स्थान मिळणे दुर्मीळ होते; मात्र अहिल्यादेवींनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे आव्हान समर्थपणे स्वीकारले. त्यांना लोकांच्या समस्या समजून घेण्याची आणि त्यावर संवेदनशीलतेने उपाय करण्याची विलक्षण क्षमता होती.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. त्यांचे पती खंडेराव होळकर यांचा कुंभेरच्या युद्धात मृत्यू झाला. त्या वेळी सती जाण्याचा समाजाचा दबाव होता; परंतु मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून रोखले. हा निर्णय भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यातून एका महान राज्यकर्तीचा उदय झाला. पुढे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले आणि काही काळानंतर त्यांच्या पुत्राचाही मृत्यू झाला. सततच्या वैयक्तिक दुःखांनी खचून न जाता अहिल्यादेवींनी धैर्याने राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. एका स्त्रीने इतक्या प्रतिकूल परिस्थितीत नेतृत्व स्वीकारणे ही त्या काळात अत्यंत धाडसी बाब होती.

अहिल्यादेवी होळकर यांनी इंदूर संस्थानाचा कारभार अत्यंत कुशलतेने चालविला. त्यांनी महेश्वर ही आपली राजधानी केली. नर्मदेच्या काठी वसलेले महेश्वर त्यांच्या कारकिर्दीत सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या समृद्ध झाले. त्यांनी राज्यातील प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त आणली. त्यांच्या दरबारात न्यायदान अत्यंत निष्पक्षपणे केले जाई. गरीब असो किंवा श्रीमंत, सर्वांना समान न्याय मिळत असे. त्या स्वतः जनतेच्या तक्रारी ऐकत असत. लोकांच्या समस्या समजून घेऊन तत्काळ उपाययोजना करण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला स्थान नव्हते.

अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लोककल्याणाची भावना. त्यांनी प्रजेच्या सुखाला सर्वोच्च प्राधान्य दिले. शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था, विहिरी, तलाव आणि धरणांची उभारणी करण्यात आली. व्यापाऱ्यांना सुरक्षित वातावरण दिले गेले. व्यापार आणि उद्योगांना



प्रोत्साहन दिल्यामुळे आर्थिक प्रगती झाली. महेश्वरी साड्यांच्या परंपरेला त्यांनी चालना दिली. आजही महेश्वरी साडी ही भारतीय वस्त्रसंस्कृतीचा अभिमान मानली जाते.

अहिल्यादेवींनी महिलांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षेसाठी अनेक निर्णय घेतले. स्त्रियांच्या समस्या समजून घेऊन त्यांना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले. विधवा महिलांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्त्रियांना मालमत्तेचे अधिकार मिळावेत, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी त्या जागरूक होत्या. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून समाजनिर्मितीत तिची महत्त्वाची भूमिका आहे, हा संदेश त्यांच्या जीवनातून दिसून येतो.

अहिल्यादेवी होळकर यांची न्यायव्यवस्था अत्यंत प्रभावी होती. त्यांच्या दरबारात अन्यायाला मुळीच थारा नव्हता. त्या प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करून निर्णय घेत असत. लोकांना न्याय मिळावा यासाठी त्या कटिबद्ध होत्या. त्यांचा न्याय निष्पक्ष आणि मानवतावादी होता. त्यामुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल अपार आदर निर्माण झाला. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवले. चुकीचे वर्तन करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाई.

अहिल्यादेवींच्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था होती. त्यांनी सैन्य व्यवस्था मजबूत ठेवली. शत्रूंचा सामना करण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेतले. परंतु युद्धापेक्षा शांततेला आणि विकासाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यांच्या प्रशासनात आर्थिक शिस्त होती. राज्याच्या उत्पन्नाचा उपयोग लोककल्याणासाठी करण्यात येत असे. खर्चात काटकसर आणि जनहिताचा विचार हा त्यांच्या प्रशासनाचा पाया होता.

अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात धार्मिकता होती; परंतु ती अंधश्रद्धेवर आधारित नव्हती. त्यांचा धर्म म्हणजे मानवसेवा होता. गरीब, गरजू आणि पीडित लोकांना मदत करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी अनेक दानधर्म केले. अन्नछत्रे चालवली. यात्रेकरू, साधू-संत आणि गरजू लोकांसाठी निवासव्यवस्था केली. त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. राजसत्ता असूनही त्यांनी वैभवापेक्षा सेवेला महत्त्व दिले.

त्यांच्या जीवनातील साधेपणा आजच्या काळातही प्रेरणादायी वाटतो. त्या राजवाड्यात राहत असल्या तरी त्यांच्या वागण्यात अहंकार नव्हता. त्या सामान्य लोकांशी प्रेमाने संवाद साधत असत. जनतेच्या दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या समस्या स्वतः समजून घेणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच लोकांनी त्यांना 'लोकमाता' ही उपाधी दिली.

अहिल्यादेवी होळकर यांनी शिक्षण आणि संस्कृतीच्या जतनासाठीही महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी विद्वान, कवी, पंडित आणि कलाकारांना आश्रय दिला. महेश्वर हे त्या काळात संस्कृती आणि साहित्याचे केंद्र बनले. सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच त्यांनी लोककलेलाही प्रोत्साहन दिले. समाजातील नैतिक मूल्ये टिकून राहावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

भारतीय स्त्रीशक्तीचा विचार केला तर अहिल्यादेवींचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी संकटांना न घाबरता नेतृत्व स्वीकारले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून जनतेच्या हितासाठी कार्य केले. त्यांचे जीवन हे संघर्षातून उभे राहिलेल्या यशाचे उदाहरण आहे. आजच्या महिलांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. आत्मविश्वास, निर्णयक्षमता, कर्तव्यनिष्ठा आणि लोकसेवा या गुणांचा आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून दिसतो.

आजच्या काळात प्रशासनात पारदर्शकता, न्याय आणि लोकाभिमुखता यांची आवश्यकता अधिक जाणवते. अशा वेळी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य मार्गदर्शक ठरते. त्यांनी सत्ता ही जनसेवेचे साधन मानली. आज अनेक ठिकाणी भ्रष्टाचार, अन्याय आणि स्वार्थी राजकारण दिसून येते; परंतु अहिल्यादेवींच्या प्रशासनात प्रामाणिकपणा आणि नैतिकता सर्वोच्च होती. म्हणूनच त्यांच्या कार्याचा अभ्यास आजही प्रशासनशास्त्र आणि समाजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

अहिल्यादेवींच्या कार्यातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश मिळतो. त्या काळात स्त्रियांना अनेक सामाजिक बंधने होती; तरीही त्यांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहासात अजरामर स्थान मिळविले. त्यांनी सिद्ध करून दाखवले की स्त्री सक्षम असेल तर ती राज्यकारभार, समाजकारण आणि नेतृत्व या सर्व क्षेत्रांत यशस्वी होऊ शकते. त्यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणास्त्रोत आहे.

भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्यात अहिल्यादेवींचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी केवळ धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला नाही, तर सांस्कृतिक एकात्मतेलाही बळ दिले. उत्तर ते दक्षिण भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी कामे केली. यामुळे देशाच्या सांस्कृतिक ऐक्याला चालना मिळाली. त्यांच्या कार्यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते.

महेश्वर नगरीला त्यांनी दिलेली सांस्कृतिक ओळख आजही टिकून आहे. नर्मदेच्या घाटांवर उभे असलेले मंदिरसमूह, राजवाडे आणि वास्तू त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात. महेश्वरी वस्त्रोद्योगाला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन आहे. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन आर्थिक स्वावलंबन वाढविण्याचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रगत होता.

अहिल्यादेवींच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संकटसमयी दाखवलेले धैर्य. सततच्या कौटुंबिक दुःखांनंतरही त्यांनी खचून न जाता जनतेच्या हितासाठी काम केले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून कर्तव्याला प्राधान्य देणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता होती. त्यांच्या जीवनातून आपल्याला संकटांवर मात करून पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

त्यांच्या प्रशासनात धार्मिक सहिष्णुता होती. विविध समाजघटकांना त्यांनी समान वागणूक दिली. कोणत्याही धर्माविषयी द्वेषभावना न ठेवता सर्वांच्या श्रद्धेचा आदर केला. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे समाजात सौहार्द आणि शांतता टिकून राहिली. आजच्या काळात सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज अधिक आहे.


अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही. आजही त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची उपयुक्तता जाणवते. चांगले प्रशासन कसे असावे, जनतेच्या गरजा कशा ओळखाव्यात, समाजातील दुर्बल घटकांना कसा आधार द्यावा आणि सत्ता लोककल्याणासाठी कशी वापरावी याचे आदर्श उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. म्हणूनच त्यांना भारतीय इतिहासातील सर्वोत्तम राज्यकर्त्यांपैकी एक मानले जाते.

महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यांच्या कार्याचा अभ्यास करून नवीन पिढीला प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक ठिकाणी व्याख्याने, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. ही जयंती केवळ स्मरणाचा दिवस नसून आदर्श जीवनमूल्यांचा विचार करण्याची संधी आहे.

आजच्या समाजात नैतिक मूल्यांची घसरण, वाढती असमानता आणि स्वार्थी वृत्ती यांसारख्या समस्या दिसून येतात. अशा परिस्थितीत अहिल्यादेवींचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांनी लोकसेवा, न्याय, प्रामाणिकपणा आणि मानवतेच्या मूल्यांना प्राधान्य दिले. त्यांच्या जीवनातून समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी आपल्या कार्याने स्त्रीशक्तीचा नवा आदर्श निर्माण केला. लोककल्याणकारी प्रशासन, धार्मिक सहिष्णुता, न्यायप्रियता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. त्या केवळ एका राज्याच्या राणी नव्हत्या, तर जनतेच्या हृदयातील लोकमाता होत्या. त्यांच्या कार्याचा वारसा आजही समाजाला प्रेरणा देत आहे.

३१ मे रोजी त्यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे, न्याय आणि समानतेसाठी कार्य करणे, स्त्रीसन्मान जपणे आणि लोकहिताला प्राधान्य देणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे भारतीय संस्कृतीतील सेवा, त्याग आणि मानवतेच्या महान परंपरेचे प्रतीक आहे. त्यांचा आदर्श प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी राहील आणि लोककल्याणाच्या कार्यासाठी सदैव मार्गदर्शक ठरेल.



- डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# सर्वधर्मसमभाव हाच खरा राष्ट्रवाद - विजय तांबे



**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** सर्वधर्मसमभाव हीच भारताची ओळख आणि हाच खरा राष्ट्रवाद आहे. १८८५ मध्ये जात, धर्म, भाषा, वर्ण, रंग, वंश हे सर्व सोडून हिंदू, पारशी, ख्रिश्चन, मुसलमान, शीख समाजातील नागरिक एकत्र येऊन त्यांनी काँग्रेसची स्थापना केली. हीच भारत राष्ट्र उभारणीची सुरुवात होय. भारतात एकत्वाची भावना निर्माण करून त्याचे नेतृत्व करण्याचे काम महात्मा गांधीजींनी केले. दलित समाजाला आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. गांधी आणि आंबेडकरांमध्ये मतभेद होते, परंतु देशासाठी ते एकत्र होते. त्याचे फलित म्हणजे भारतीय राज्यघटना आहे असे मत ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत विजय तांबे यांनी व्यक्त केले.

रविवारी (दि. २४ मे) पिंपरी येथे फुले, गांधी, नेहरू विचारमंच च्या वतीने आयोजित केलेल्या "महात्मा गांधी आणि राष्ट्रवाद" या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानात विजय तांबे बोलत होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आयोजक दाहर मुजावर, अक्षय शहरकर, केनिथ रेमी तसेच विष्णू नेवाळे, अशोक मोरे, अमरसिंह नाणेकर, मिलिंद फडतरे, किरण खाजेकर, मयूर जैस्वाल, गौरव चौधरी, अनिरुद्ध कांबळे, नरेंद्र बनसोडे, हभप सांगोळे, चैतन्य रणदिवे, महेश पाटील, बाबासाहेब पाटील, गिरिजा कुदळे, सायली नढे, जीविका उठाडा, संदेश भंडारी, महालिंग स्वामी, यशराज पारखी, मॅन्युअल डिसोझा, निक्सन ऑगस्टीन, इरफान शेख, बसवराज कंजे, जिंदा सांडभोर, सूरज कुलकर्णी, सचिन दुरगुडे, वैजनाथ शिरसाठ, अनिल कदम, मनोज ढकोलिया, मंगेश मोरे, राजू शेख, अल्ताफ शेख, सुर्यकांत जाधव, किरण नढे आदी उपस्थित होते.

विजय तांबे यांनी सांगितले की, भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा पाया १९२८ मध्ये झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात रचला गेला. हा सत्याग्रह अस्मितेच्या मुद्द्यावर लढला गेला. यामध्ये सर्व समाज घटकांनी सहभाग घेतला होता. १९४२ मध्ये सेवाग्राम मध्ये झालेल्या बैठकीत निशस्त्र प्रतिकाराचा निर्णय झाला. १९४७ ला स्वातंत्र्यप्राप्ती वेळी विस्टन चर्चिल याने भाकीत केले की हा देश खूप काळ एकत्र राहू शकणार नाही. या देशात अनेक धर्म, जाती, वंश आहे. परंतु त्याचे भाकीत भारतीय लोकशाहीचा राज्यघटनेमुळे खरे ठरणार नाही. देशात एकत्वाची भावना निर्माण करून त्याचे नेतृत्व महात्मा गांधी यांनी केले. भारतातील दलित समाजाला आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. पुण्यामध्ये महात्मा फुले वाड्यावर गेल्यावर महात्मा गांधी म्हणाले होते की देश घडविणारे खरे महात्मा हे जोतीराव फुले आहेत. फुले, गांधी, नेहरू या महान व्यक्तींमुळे भारतीय राष्ट्रवाद सर्व समावेशक आहे. घटना समितीच्या शेवटच्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणाले आहेत की घटना चांगली दिली आहे, परंतु ती चालवणारे देखील चांगले पाहिजेत. अशी १८८५ ते भारतीय राज्यघटना या काळातील विस्तृत माहिती विजय तांबे यांनी दिली. अक्षय शहरकर, केनिथ रेमी यांनी स्वागत केले आणि दाहर मुजावर यांनी सूत्र संचालन केले.

# अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त हिवरवाडी येथे विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राजमाता ग्रुप हिवरवाडी यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात हा जयंती उत्सव साजरा करण्यात येणार असून नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शनिवार दि. ३० मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ ते १२ या वेळेत मेडिकेअर ब्लड सेंटर, सोलापूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून एच. व्ही. देसाई नेत्र तपासणी केंद्र, करमाळा यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी शिबिरही पार पडणार आहे.



सायंकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत प्रा. डॉ. संजय चौधरी यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. ह्रराजमाता अहिल्याबाई होळकर यांच्याकडून चालू पिढीने काय घ्यावेह्व या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर रात्री ८.३० ते १० या वेळेत स्नेह भोजनाचा कार्यक्रम होणार असून राहुल गोविंद पवार, गोदावरी अँग्रो यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

रविवार दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजता राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी ७ ते १० या वेळेत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या जयंती उत्सवात शिवमुद्रा बँजो, एस.के पेपर ब्लास्ट व आकर्षक डेकोरेशन हे विशेष आकर्षण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. हिवरवाडी (ता. करमाळा) येथे होणाऱ्या या कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राजमाता ग्रुप हिवरवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सय्यद जलालुद्दीन बुखारी बाबा यांच्या ऊरूसाला आज पासून सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कंबर तलाव समोरील सय्यद जलालुद्दीन बुखारी बाबा यांच्या ४४८ व्या ऊरूसाला आज शनिवार पासून सुरुवात होणार आहे. त्याप्रमाणे आज ३० मे रोजी सायंकाळी परचम कुशाई होणार आहे, ३१ मे रोजी रात्री साडे आठ नंतर संदल काढण्यात येणार आहे.

१ जुन रोजी संध्याकाळी साडेसहा नंतर चिरागा - फातेहा खानीचे आयोजन करण्यात आले आहे. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी असर नमाज नंतर जीआरत केली जाणार असल्याची माहिती सय्यद बुखारी दर्गाह ट्रस्टचे सचिव हाजी हारुन हाजी इब्राहिम शेख यांनी दिली आहे.

तरी जास्तीत जास्त भक्त भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहावे असे आवाहन दर्गाह कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.



## वात्रटिका

### विषारी दारूचे बळी

व्यसनाला पाय फुटतात
आणि ते अड्ड्यावर जातात...
दारू नाही विष उतरते घशात
आणि पट्टे झुलत घरी येतात...
आधी पिऊन आता कायमचं
जावून संसार उघडा पडतो...
मागच्यांचा वनवास वाढतो
तो कायमचा संसार सोडतो...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त सोलापुरातील राजमाता अहिल्यादेवी मध्यवर्ती जन्मोत्सव मंडळाच्या वतीने विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भातील नियोजन बैठक नुकतीच पार पडली.

अहिल्यादेवी जयंती स्थापना कार्यक्रम शुक्रवार दि. २९ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला असून राज्यसभा खासदार ज्योतीताई वाघमारे, उत्सव अध्यक्षा मनीषा माने, अशोक तरंगे, श्रीशैल मामा हत्तुरे आणि उत्सव अध्यक्ष अजयकुमार देवकते यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

दि. २९, ३० आणि ३१ मे दरम्यान अहिल्यादेवी मातेचे पूजन व दुग्धाभिषेक विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच वृक्षारोपण आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. दि. ३० मे रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्राचे पुस्तक आणि रोपांचे वाटप केले जाणार आहे.

महिला सक्षमीकरण आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. हा कार्यक्रम अहिल्यादेवी पुतळा परिसर, सोलापूर येथे पार पडणार आहे.

दरम्यान, धनगर समाजाला एस.टी. प्रवगार्तून आरक्षण मिळावे यासाठी शासनाला जागे करण्यासाठी आंदोलनाची भूमिकाही स्पष्ट करण्यात आली. उपोषण, मोर्चे आणि निवेदनांच्या माध्यमातून लढा उभारणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या पत्रकार परिषदेस विजय देवकते, अर्चना बंडगर, धनंजय कारंडे आदी उपस्थित होते.

# जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्हा रुग्णालयात विविध उपक्रम



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा रुग्णालयात जागतिक तंबाखू विरोधी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाच्या पुढाकाराने २९ मे रोजी हा कार्यक्रम पार पडला.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश कोपुरवाड तसेच निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन झाले. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चंद्रकांत क्षिरसागर, जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. रोहन वायचळ, दंत शल्यचिकित्सक डॉ. सुवर्णा राठोड, मेट्रन श्रीमती विजयमाला बेले तसेच मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे समन्वयक अनिल गुंजे उपस्थित होते.

कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्येथीम : 'Unmasking the appeal: Countering nicotine & tobacco addiction' म्हणजेच 'आकर्षणाचा मुखवटा उतरवूया – निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाला प्रतिकार करूया'.

**आरोग्य तपासणी :** जिल्हाधिकारी कार्यालय व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी–कर्मचाऱ्यांची मौखिक आरोग्य तपासणी व समुपदेशन सत्र.

**सांस्कृतिक उपक्रम :** बासरी व तबला वादनाद्वारे Music Therapy चे प्रात्यक्षिक सुमीत घाडगे व रत्नदिप वारगड यांनी सादर केले.

**स्पर्धा:** स्वाक्षरी मोहिम व पोस्टर स्पर्धा आयोजित.

**मनोगत :** तंबाखू मुक्ती केंद्राच्या मदतीने व्यसन सोडलेल्या रुग्णांनी अनुभव कथन केले.

**प्रमुख संदेश :** अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सकांनी तंबाखूच्या व्यसनामुळे होणाऱ्या असंसर्गजन्य आजारांची माहिती दिली व तंबाखू मुक्ती केंद्राचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

अमित महाडिक व श्रीमती मंजूश्री मुळे यांनी उपस्थितांना तंबाखू मुक्तीची शपथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस.बी. दळवी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. रोहन वायचळ यांनी केले.

# अरणच्या यशोदा गुरुकुलला बेस्ट प्री स्कूल ऑफ द ईयर पुरस्कार!



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुंबई येथे संपन्न झालेल्या ३३ व्या भारतीय शिक्षण परिषदेमध्ये जिजाऊ महिला मंडळ तीर्थक्षेत्र अरण (तालुका माढा, जिल्हा सोलापूर) संचलित यशोदा गुरुकुल अरण या शाळेला बेस्ट प्री स्कूल ऑफ द ईयर हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देत असलेल्या शिवानी पंजाबी यांच्या हस्ते संस्थेच्या अध्यक्षा सुनीता रणदिवे व यशोदा गुरुकुलचे मार्गदर्शक हरिदास रणदिवे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

२०२५–२६ ह्या शैक्षणिक वर्षात नर्सरी, ज्युनिअर केजी व सिनियर केजी या विभागामध्ये यशोदा गुरुकुल मध्ये आयोजित केलेले विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडाविषयक उपक्रम तसेच विद्यार्थ्यांसाठीच्या आयोजित केलेल्या विविध स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या माता पालकांसाठी आयोजित केलेले विविध उपक्रम, प्रशस्त क्रीडांगण, पर्यावरण पूरक इमारत व विविध प्रजातींच्या वृक्षांची केलेली लागवड व जोपासना विद्यार्थ्यांची झालेली सर्वांगीण प्रगती याचा आढावा घेऊन हा पुरस्कार यशोदा गुरुकुलला प्रदान करण्यात आला आहे.

या पुरस्काराबद्दल आमदार रणजितसिंह मोहिते–पाटील, खासदार धैर्यशील मोहिते–पाटील, आमदार अभिजीत पाटील, तुळजापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी यशोदा गुरुकुलचे विश्वस्त, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व सेवकांचे अभिनंदन केले आहे.

राष्ट्रीय पातळीवरील आयोजित केलेल्या या शिक्षण परिषदेमध्ये देशातील शिक्षण पद्धती, नवीन तंत्रज्ञान, परीक्षा पद्धती व नवीन शैक्षणिक धोरणांवर चर्चा करण्यात आली. शिक्षण हे पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्ये कशी रुजावावीत यावर चर्चा झाली. देशभरातील उत्कृष्ट शाळा, शिक्षक व शिक्षण क्षेत्रातील नवोदीत शिक्षण संस्था या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. यावेळी उत्कृष्ट शाळा, शिक्षक व संस्था यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

# भाजपचे नगरसेवक दत्तात्रय नडगेरी यांचे निधन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक २२ अ चे नगरसेवक आणि भारतीय जनता पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते दत्तात्रय नडगेरी यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने सोलापूरच्या राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात मोठी पोकळी निर्माण झाली असून, सर्वत्र तीव्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

दत्तात्रय नडगेरी हे माजी सहकार मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांचे खंदे आणि विश्वासू समर्थक म्हणून ओळखले जात होते. आमदार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी प्रभागात अनेक विकासकामे करत सर्वसामान्य जनतेच्या मनात हक्काचे स्थान निर्माण केले होते.

नगरसेवक दत्तात्रय नडगिरी यांचे शुक्रवारी दुपारी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ५२ वर्षाचे होते. नडगिरी हे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. तसेच ते सुभाष देशमुख यांचे कट्टर समर्थक होते. जानेवारी महिन्यात झालेल्या महापालिका निवडणुकीत ते प्रभाग 22 मधून भाजपकडून निवडून आले होते.

गेल्या काही महिन्यांपासून ते आजारी होते. उपचारादरम्यानच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हॉस्पिटलकडे धाव घेतली. रात्री नऊ वाजता त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत

**एक सच्चा आणि प्रामाणिक कार्यकर्ता हरपला**

नडगेरी यांची ओळख अत्यंत साधे, गरीब, प्रामाणिक आणि पक्षाशी सदैव एकनिष्ठ राहणारे सच्चे कार्यकर्ते अशी होती. प्रभाग २२ मधील नागरिकांच्या सुख–दुःखात धावून जाणारा एक लोकप्रतिनिधी गमावल्याने परिसरावर शोककळा पसरली आहे. "त्यांच्या जाण्याने समाजाची कधीही भरून न निघणारी मोठी हानी झाली आहे. त्यांच्या कायार्ची आणि आठवणींची प्रेरणा सदैव कायम राहील," अशा भावना त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी आणि त्यांच्या चाहत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून व प्रत्यक्ष भेटून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

# जिल्हा परिषद वाचनालयाच्या उन्नतीसाठी सभापती सातपुते यांची पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी जिल्हा परिषदेच्या वाचनालयास सदिच्छा भेट देत तेथील व्यवस्थापन, पुस्तकांची उपलब्धता तसेच वाचकांसाठी उपलब्ध सुविधा यांचा सविस्तर आढावा घेतला.

वाचनालय अधिक सुसज्ज, अद्ययावत आणि सर्वसामान्य वाचकांसाठी उपयुक्त व्हावे, या उद्देशाने विविध स्तरांवर प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पाहणीदरम्यान त्यांनी वाचनालयाच्या नूतनीकरणाच्या कामाची माहिती घेत समाज कल्याण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

वाचन संस्कृती जपण्यासाठी आणि विद्यार्थ्यांपासून स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासकांपर्यंत सर्वांना दजेर्दार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वाचनालयाची भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले.

'जिल्हा परिषदेचे हे वाचनालय येणाऱ्या काळात सर्व आधुनिक सोयी–सुविधांनी युक्त होऊन वाचकांसाठी अधिक समृद्ध आणि प्रेरणादायी ठरेल, असा मला पूर्ण विश्वास आहे,' अशी प्रतिक्रिया सभापती संस्कृती सातपुते यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

# दारू पिऊन ट्रक चालवणाऱ्या चालकावर करमाळा पोलिसांची कारवाई

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील जातेगाव येथे बकरी ईद निमित्त सुरू असलेल्या नाकाबंदी दरम्यान दारूच्या नशेत ट्रक चालवणाऱ्या चालकावर करमाळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, करमाळा पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस कर्मचारी वैभव रामदास राऊत हे सहकाऱ्यांसह 27 मे 2026 रोजी सायंकाळी जातेगाव परिसरात नाकाबंदी करत होते. त्यावेळी समोरून येणारा टी. एन. 88 जे 9948 क्रमांकाचा ट्रक चालक संशयास्पदरीत्या वाहन चालवत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

पोलिसांनी ट्रक थांबवून चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव कंडासामी रामासामी (वय 52, रा. ए.एस. पेटाई, जि. नमक्कल, तामिळनाडू) असे सांगितले. चौकशीदरम्यान चालकाच्या तोंडातून दारूचा वास येत असल्याने पोलिसांनी त्याची ब्रेथ ॲनालायझर मशीनद्वारे तपासणी केली. त्यामध्ये चालकाने मद्यप्राशन केल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर पोलिसांनी मोटार वाहन अधिनियम 1988 च्या कलम 185 अन्वये चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार सचिन अरुण हिंगमिरे करत आहेत.

# टेंभुर्णीत मध्यरात्रीचा थरार! तीन कोटींच्या दरोड्याचा पर्दाफाश; २ कोटी ७० लाखांचा मुद्देमाल जप्त

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी–करमाळा रोडवरील बंद पडलेल्या टोलनाक्याजवळ मध्यरात्री घडलेल्या तब्बल तीन कोटी रुपयांच्या दरोड्याचा टेंभुर्णी पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत छडा लावत तब्बल २ कोटी ७० लाख ११ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रोख रक्कम, सोन्याचे दागिने व महागडे ॲपल मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या तपास कौशल्याचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

कर्नाटक राज्यातील विजयपूर जिल्ह्यातील चडचण येथील साडी व्यापारी बाहुबली एन. मुत्तीन यांच्या दुकानातील मॅनेजर धुंडाप्पा रामान्ना खलाटे (वय ३५, रा. गोटयाळ, ता. चडचण) यांना मालकांनी सुरत येथे माल खरेदीसाठी तब्बल तीन कोटी रुपयांची रोख रक्कम दोन पोत्यांमध्ये देऊन पाठविले होते. ही रक्कम आयशर टेम्पो (एमएच ४५ एएफ १५१६) मधून टेम्पो मालक नागनाथ सुर्वे व सुनील सुर्वे यांच्यासोबत नेण्यात येत होती.

दिनांक ११ मे २०२६ रोजी पहाटे सुमारे २.१५ ते २.२० वाजण्याच्या दरम्यान टेंभुर्णी–करमाळा रोडवरील बंद पडलेल्या टोलनाक्याजवळील वळणावर अचानक गजरी रंगाची विनानंबर स्विफ्ट कार टेम्पोसमोर आडवी लावण्यात आली. कारमधून उतरलेल्या चार जणांनी चाकूचा धाक दाखवत टेम्पो थांबविला. फियार्दी व त्यांच्या साथीदारांना मारहाण करून गळा दाबत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर टेम्पोच्या टपावर ताडपत्रीत बांधून ठेवलेली पैशांची दोन्ही पोती खाली उतरवून आरोपींनी ती स्विफ्ट कारमध्ये टाकून धूम ठोकली.

या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३४६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), १२६(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासाची सूत्रे सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांच्या हाती देण्यात आली.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे संजय जगताप यांनी दोन स्वतंत्र तपास पथके तयार केली. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही तपास व गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी प्रथम अजित नामदेव सुर्वे (रा. मोडनिंब) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदारांसह गुन्ह्याची कबुली दिली.

यानंतर पोलिसांनी सिद्धेश्वर नामदेव माने याला सुरत, गुजरात येथून तर शुभम शहाजी पाटील याला मोडनिंब परिसरातून ताब्यात घेतले. या गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्विफ्ट कार विकी राजाभाऊ गिड्डे याची असल्याचे निष्पन्न झाले आहे. पुढील तपासात सिद्धेश्वर माने याने चोरीतील काही रक्कम आपल्या दाजी सुरज देविदास उन्हाळे (रा. पोखरापूर, ता. मोहोळ) यांना दिल्याची माहिती समोर आली. त्यातून सोन्याची खरेदी करण्यात आल्याने त्यालाही पोलिसांनी अटक केली.



पोलीस कोठडीत कसून चौकशीदरम्यान आरोपींनी मोडनिंब येथून टेम्पोचा पाठलाग करून नियोजनबद्ध पद्धतीने दरोडा टाकल्याची कबुली दिली. चोरीच्या रकमेतून आरोपींनी तीन महागडे ॲपल मोबाईल व सोन्याचे दागिने खरेदी केल्याचेही तपासात उघड झाले.

या कारवाईत पोलिसांनी २ कोटी ६२ लाखांची रोख रक्कम, ५ लाख ४९ हजार ४४० रुपयांचे सोने तसेच २ लाख ६१ हजार ९९० रुपयांचे तीन ॲपल मोबाईल असा एकूण २ कोटी ७० लाख ११ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, करमाळा विभागाच्या सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल आत्राम हे करीत आहेत. आरोपींना २८ मे २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. ही उल्लेखनीय कारवाई राहुल आत्राम, संजय जगताप, ज्ञानदेव वाघ, विजय गोसावी, अमित बाबर, अजित मोरे, खाजाभाई मुजावर, नारायण गोलेकर, प्रकाश काटकर यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखा व टेंभुर्णी पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने पार पाडली.

## CHANGE IN NAME

I am changing my name from **WAJID JAHANGEER PATEL** To **WAJID JAHANGIR PATEL** for passport issuance as per document.

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 263

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 8 | 3 | | | | | |
| 4 | 9 | | 1 | | 7 | | 3 | 2 |
| | | 3 | 2 | 8 | 4 | | | 6 |
| | 6 | | | 1 | 5 | | | 8 |
| | 8 | | 7 | 6 | 3 | | 2 | 9 |
| 3 | | 4 | | | | | | |
| | | 1 | | 7 | | | 8 | 4 |
| 6 | 4 | | | | | 2 | | 7 |
| | 2 | | 5 | | | 6 | | 3 |

# निष्ठावंत कार्यकर्त्यांचा सन्मान की माजी आमदारांची पुन्हा वर्णी?



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये उमेदवारीसाठी हालचालींना वेग आला आहे. पक्षाकडे या मतदारसंघात स्पष्ट संख्याबळ असल्याने ही जागा सुरक्षित मानली जात असून, उमेदवारीसाठी अनेक दिग्गज नेत्यांनी मोचेबांधणी सुरू केली आहे. त्यामुळे माजी आमदारांना संधी मिळणार की संघटनेत दीर्घकाळ निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्याला न्याय मिळणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

उमेदवारीच्या शर्यतीत माजी आमदार राजेंद्र राऊत, प्रशांत परिचारक आणि दिलीप माने यांची नावे चर्चेत आहेत. दुसरीकडे भाजपचे प्रदेश सदस्य तथा माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांनीही आपली दावेदारी भक्कमपणे पुढे केली आहे.

उमेदवारीसाठी इच्छुकांकडून मुंबईत जोरदार लॉबिंग सुरू असून, मंगळवारी माजी आमदार राजेंद्र राऊत आणि दिलीप माने यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी उपस्थित होते. भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनीही वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्याची माहिती आहे. प्रशांत परिचारक आणि शहाजी पवार यांनी यापूर्वीच पक्षश्रेष्ठींच्या भेटी घेतल्याचे सांगितले जाते.

### परिचारक प्रबळ दावेदार ?

गेल्या विधानसभा निवडणुकीत प्रशांत परिचारक हे उमेदवारीसाठी इच्छुक होते. मात्र, पक्षाने विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्यावरच विश्वास दाखवला. त्यावेळी कार्यकर्त्यांकडून बंडखोरीचा आग्रह होत असतानाही परिचारक यांनी पक्षनिष्ठा जपत माघार घेतली आणि आवताडे यांच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेतला. त्यावेळी त्यांना भविष्यात विधान परिषदेची संधी देण्याचा शब्द देण्यात आल्याची राजकीय वर्तुळात चर्चा असल्याने त्यांना प्रबळ दावेदार मानले जात आहे.

### राजेंद्र राऊत यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मजबूत नेटवर्क

बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी विरोधी पक्षात असतानाही बाजार समिती, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका स्तरावर प्रभावी राजकीय पकड निर्माण केली. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील त्यांचे मजबूत नेटवर्क आणि संघटनशक्ती ही त्यांची मोठी जमेची बाजू मानली जाते. त्यामुळे स्थानिक प्राधिकरण मतदारसंघासाठी त्यांचे नावही आघाडीवर आहे.

### दिलीप माने यांचाही दावा मजबूत

विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केलेले माजी आमदार दिलीप माने यांनाही उमेदवारीच्या चर्चेत महत्त्वाचे स्थान आहे. विधानसभा निवडणुकीत संधी न मिळाल्यानंतरही त्यांनी जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकांमध्ये भाजपच्या यशासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. सध्या बाजार समितीचे सभापतिपद त्यांच्या ताब्यात असून, उमेदवारीसाठी ते मुंबईत सक्रिय असल्याचे सांगितले जात आहे.

### शहाजी पवार यांच्यासाठी 'निष्ठेला न्याय'ची मागणी

भाजपचे प्रदेश सदस्य आणि सलग सहा वर्षे जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहिलेले शहाजी पवार यांनीही आपली दावेदारी प्रभावीपणे मांडली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी सातत्याने पार पाडल्या. जिल्हाध्यक्षपदाच्या काळात मित्रपक्ष शिवसेनेशी समन्वय साधत भाजपचे सर्वाधिक आमदार निवडून आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उत्तर सोलापूर पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकवण्यातही त्यांचे नेतृत्व प्रभावी ठरले होते. त्यामुळे संघटनात्मक पातळीवर काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी द्यावी, अशी मागणी पक्षात जोर धरत आहे.

### अनुभव विरुद्ध संघटननिष्ठा

या निवडणुकीत भाजपसमोर अनुभवी माजी आमदारांना संधी द्यायची की पक्षवाढीसाठी मेहनत घेणाऱ्या संघटनात्मक नेतृत्वाला न्याय द्यायचा, असा पेच निर्माण झाला आहे. एकीकडे निवडणूक लढविण्याचा अनुभव, स्थानिक नेटवर्क आणि राजकीय प्रभाव असलेले नेते आहेत, तर दुसरीकडे पक्षासाठी सातत्याने काम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा प्रश्न आहे.

उमेदवारीबाबत अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींकडून घेतला जाणार असल्याने इच्छुक नेते आणि त्यांच्या समर्थकांचे लक्ष आता मुंबईतील राजकीय घडामोडींवर लागले आहे. भाजपचा उमेदवार कोण ठरणार, याची उत्सुकता जिल्हाभरात वाढली आहे.

# लोककवी प्रशांत मोरे यांच्या काव्यमैफिलीत रसिक मंत्रमुग्ध!



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती सप्ताह अंतर्गत शुक्रवारी आयोजित काव्यमैफिलीमध्ये मुंबईचे लोककवी प्रा. प्रशांत मोरे यांच्या प्रभावी सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. विविध छटांच्या कविता, ओव्या, समकालीन विषयांवरील मुक्त विचार आणि मनाला भिडणारे काव्यपंक्तींचा वर्षाव करत त्यांनी उपस्थितांची दाद मिळवली.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा हे होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक व स्वागत विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले. अहिल्यादेवी जयंतीनिमित्त उद्या (शनिवारी) सकाळी आठ वाजता सोलापूर शहरातील नार्थकोट मैदान ते अहिल्यादेवी पुतळापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी कविता ही फक्त अभिव्यक्ती नसून समाजाचे विवेक जागृत ठेवणारी शक्ती आहे, असे नमूद केले. विद्यार्थ्यांनी साहित्यसंस्कृतीकडे तसेच राष्ट्रभक्तीकडे वळले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी लोककवी प्रशांत मोरे यांनी आई, प्रेम, निसर्ग, सामाजिक प्रश्न, आत्मसंघर्ष आणि आशावाद अशा विविध विषयांवर आधारित कविता सादर केल्या. त्यांच्या प्रभावी आवाजात व गेय लयीत मांडलेल्या कविता रसिकांच्या मनात भावस्पर्शी ठसा उमटवून गेल्या. काही निवडक कविता सादर करताना सभागृहात टाळ्यांचा कडकडाट उसळला. या कार्यक्रमास व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, प्रा. सचिन गायकवाड, अधिसभा सदस्य चन्नवीर बंकुर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले.

# कुमार व मुली गट राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा सोलापूरात दोन जूनपासून



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** कुमार व मुले गटाची ५२वी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा सोलापुरात किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या वतीने दोन जून पासून सुरू होणार आहे.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन यांच्या मान्यतेने ही स्पर्धा नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर ५ जूनपर्यंत होणार असल्याची माहिती किरण स्पोर्ट्स क्लब तथा स्पर्धा समितीच्या अध्यक्षा अलकाताई राठोड यांनी दिली. यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, संदीप तावडे, स्पर्धेचे मार्गदर्शक सुभाष चव्हाण, सचिन चव्हाण, नागेश बिराजदार, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष श्रीकांत ढेपे, स्पर्धा समितीचे सचिव मोहन रजपूत व असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव राजाराम शितोळे आदी उपस्थित होते.

स्पर्धेसंबंधी अधिक माहिती सांगताना त्या म्हणाल्या, या स्पर्धेतील मैदानास स्वर्गीय अजितदादा क्रीडा नगरी असे असे नाव देण्यात आले आहे. या स्पर्धा सकाळी, सायंकाळी व रात्री विद्युत झोतात होणार आहेत. या स्पर्धेची तयारी पूर्ण झाली असून यासाठी चार मैदाने तयार करण्यात आली आहे. स्पर्धेचा उद्घाटन सोहळा दोन जून रोजी सायंकाळी पाच वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेतील खेळाडूंची निवास व्यवस्था नेहरूनगर येथील जय जवान जय किसान सैनिक स्कूल आणि गांधी आश्रम शाळा येथे तर मुलींची व्यवस्था आयडियल स्कूलमध्ये करण्यात आली आहे. सर्वांची भोजन व्यवस्था सुंदर मल्टीपर्पज हॉलमध्ये केली आहे.

या पत्रकार परिषदेस महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, संदीप तावडे, स्पर्धेचे मार्गदर्शक सुभाष चव्हाण, सचिन चव्हाण, नागेश बिराजदार, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष श्रीकांत ढेपे, स्पर्धा समितीचे सचिव मोहन रजपूत व असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव राजाराम शितोळे आदी उपस्थित होते.

### महाराष्ट्राचे कुमार व मुली संघ निवडणार

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव म्हणाले, या स्पर्धेत महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यातील २४ कुमार व २४ मुलीचे असे ४८ संघातील खेळाडू,संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक आणि पंच पदाधिकारी असे १ हजार सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतून महाराष्ट्राचे कुमार व मुलीचे संघ निवडण्यात येणार असून हे संघ हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या 45 व्या राष्ट्रीय अजिंक्यपद व कुमार व मुली गटाच्या स्पर्धेत भाग घेतील. कार्याध्यक्ष व सरचिटणीस यांच्यासह राज्याचे निवड समितीचे सदस्य श्रीरंग बनसोडे (सोलापूर), विशाल पाटील (जळगाव), यतीन आक्रे (पालघर), नंदिनी धुमाळ (मुंबई ) हे महाराष्ट्राचे कुमार व मुली संघ निवडतील.

# DCP प्रितम यावलकर ॲक्शन मोडवर!

## सोलापुरातील तिघा गुन्हेगारांची टोळी तडीपार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासनाने एक मोठी कारवाई केली आहे. जुना देगाव नाका परिसरातील साठे पाटील वस्ती येथील एका सक्रिय गुन्हेगारी टोळीला सोलापूर शहर आणि उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार (हद्दपार) करण्यात आले आहे.

### तडीपार केलेल्या आरोपींची नावे

१) तेजस सुधाकर बैरुनगी (वय २४ वर्षे, रा. साठे पाटील वस्ती, जुना देगाव नाका, सोलापूर) - (टोळी प्रमुख)

२) रोहीत यल्लप्पा लोणी (वय २४ वर्षे, रा. साठे पाटील वस्ती, जुना देगाव नाका, सोलापूर)

३) संदेश नागेश रामगुडे (वय २३ वर्षे, रा. साठे पाटील वस्ती, जुना देगाव नाका, सोलापूर)

### पोलीस उप-आयुक्तांचे आदेश

या टोळीच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी सलगर वस्ती पोलीस ठाण्याकडून 'महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१' मधील कलम ५५ अन्वये तडीपारीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) प्रितम यावलकर यांनी कायदेशीर कारवाई करत २५ मे २०२६ रोजी या तिघांना दोन वर्षांसाठी सोलापूर शहर व जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश पारित केले आहेत.

### अनेक गंभीर गुन्हे दाखल

या टोळीविरुद्ध सन २०२१, २०२२, २०२३ आणि २०२५ या कालावधीत टोळीच्या माध्यमातून बेकायदेशीर कृत्य केल्याचे अनेक गुन्हे दाखल आहेत. यामध्ये जाणीवपूर्वक दुखापत करणे, बेकायदेशीर मंडळी जमवून दंगा करणे, चोरी आणि घरफोडी यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे.

# घरकूल लाभार्थ्यांसाठी दिलासादायक निर्णय

## १० टक्के मोफत वाळू राखीव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य शासनाने घरकूल लाभार्थ्यांना मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आता वाळू घाटांमधून उपलब्ध होणाऱ्या वाळूपैकी १० टक्के वाळू घरकूल लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. या निर्णयामुळे घरकूल बांधकामासाठी भेडसावणारी वाळूची टंचाई दूर होण्यास मदत होणार असून, रखडलेली बांधकामे गती घेण्याची शक्यता आहे.

शासनाच्या नियमानुसार पात्र घरकूल लाभार्थ्यांना ठरावीक प्रमाणात मोफत वाळू उपलब्ध करून दिली जाते. यासाठी संबंधित घरकूल योजनेची मंजुरी आणि लाभार्थ्यांची पात्रता आवश्यक असते. मात्र, आतापर्यंत वाळू उत्खननातून उपलब्ध होणाऱ्या साठ्यातील मर्यादित हिस्सा घरकूल लाभार्थ्यांसाठी राखीव असल्याने अनेकांना वेळेवर वाळू मिळण्यात अडचणी येत होत्या.

उत्खननाचे प्रमाण कमी असल्यास घरकूल लाभार्थ्यांना आवश्यक वाळू मिळत नसल्याने अनेक घरकुलांची बांधकामे रखडत होती. याबाबत लाभार्थ्यांकडून सातत्याने तक्रारी करण्यात येत होत्या. ही बाब लक्षात घेऊन राज्य शासनाने नवीन निर्णय घेत वाळूचा राखीव हिस्सा वाढवून १० टक्के निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे घरकूल योजनेंतर्गत बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांना अधिक प्रमाणात वाळू उपलब्ध होणार असून, बांधकामाची गती वाढण्यास मदत होणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यास या निर्णयाचा मोठा फायदा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

घरकूल लाभार्थ्यांसाठी घेतलेल्या या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार असून, राज्यातील विविध घरकूल योजनांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळण्याची शक्यता आहे.

# शेतकऱ्यांचा संयम सुटला; सबस्टेशनला वेढा, शंभूराजे जगताप यांच्या मध्यस्थीने तणाव निवळला

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** वाढत्या उन्हाळ्याच्या तीव्रतेत आधीच पाणी आणि विजेच्या गंभीर प्रश्नाने होरपळणाऱ्या करमाळा तालुक्यातील बोरगाव येथील शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अखेर अंत झाला. विजेची कपात ८ तासांवरून थेट ६ तासांवर आणल्याने आणि त्यातच गेल्या ५ दिवसांपासून वीज गायब असल्याने संतप्त झालेल्या बोरगावच्या ग्रामस्थांनी, महिला व लहान मुलांसह पोटेगाव-बोरगाव हद्दीवरील सबस्टेशनला चहूबाजूंनी वेढा घातला. यामुळे अधिकारी आणि नागरिकांमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला होता. अखेर बाजार समितीचे संचालक शंभूराजे जगताप यांनी मध्यस्थी करत यातून मार्ग काढला.

पाच दिवसांपासून गाव अंधारात; संतप्त ग्रामस्थ रस्त्यावर बोरगाव हे नदीकाठचे गाव असून, गेल्या वर्षी झालेल्या पूरपरिस्थितीमुळे येथील शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. त्यातून सावरण्याचा प्रयत्न करत असतानाच, सध्या सुरू असलेल्या कडक उन्हाळ्यात महावितरणने वीज कपातीचे सत्र सुरू केले आहे. दोन ते तीन दिवस 'मेंटेनन्स'च्या नावाखाली वीज बंद ठेवण्यात येत असल्याने पिके करपून चालली आहेत. या त्रासाला कंटाळून संपूर्ण गावाने सबस्टेशनवर धडक दिली.

### अतिभार आणि रखडलेले टेंडर आले समोर

आंदोलनाची माहिती मिळताच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंभूराजे जगताप यांनी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय नेत्यांना सोबत घेऊन घटनास्थळी धाव घेतली.



त्यांनी महावितरणच्या ज्युनियर इंजिनिअरशी थेट चर्चा केली. या चर्चेदरम्यान, सबस्टेशनवर अतिरिक्त लोड असल्याने नवीन 'लिंकिंग लाईन' मंजूर झाली आहे, मात्र योग्य पाठपुराव्याअभावी त्याचे टेंडर रखडल्याचे समोर आले.

शंभूराजे जगताप यांनी तात्काळ बार्शी येथील एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर कुराडे साहेब यांच्याशी फोनवरून संपर्क साधून हे काम प्रथम प्राधान्याने मार्गी लावण्याची मागणी केली.

> अशा तीव्र उन्हाळ्यात वीज आणि पाण्याअभावी शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे. तालुक्याच्या लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे. सर्व गावपुढारी आणि अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावून हा प्रश्न कायमचा सोडवावा.''
>
> **- शंभूराजे जगताप**
> (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, करमाळा)

### ...तर बार्शी कार्यालयावर थेट धडक देणार: शेतकऱ्यांचा इशारा

सुमारे दोन तास चाललेल्या या तीव्र आंदोलनानंतर अधिकाऱ्यांनी तात्पुरता मार्ग काढत गावची वीज पूर्ववत सुरू केली. मात्र, नवीन लिंकिंग लाईनचे काम चालू आठवड्यात सुरू झाले नाही, तर सर्व शेतकऱ्यांना सोबत घेऊन थेट बार्शी येथील एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर यांच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याचा इशारा शंभूराजे जगताप आणि ग्रामस्थांनी दिला आहे. आता प्रश्न उरतो की, आधीच पुराच्या तडाख्यातून सावरणाऱ्या या नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी वेळीच जागे होणार का?

### आंदोलनात यांची होती उपस्थिती:

या आंदोलनात सरपंच दीपक भोज, अजित शिंदे, प्रमोद गायकवाड, विनय ननवरे, विशाल शिंदे, अक्षय शिंदे, अक्षय घाडगे, जयसिंग घाडगे, विजय शिंदे, दत्ता म्हस्के, अण्णा म्हस्के, अशोक पाटील, संजय शिंदे यांच्यासह बोरगावचे शेकडो महिला व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामाच्या ठिकाणी महिलांसाठी तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ च्या कलम ४ नुसार १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती (Internal Complaints Committee) स्थापन करून तिची नोंद 'SHE-BOX Portal' वर करणे बंधनकारक आहे, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अविनाश मगर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

या कायद्यांतर्गत खाजगी, शासकीय, निमशासकीय, महामंडळ, उद्योग, संस्था, व्यापार, सोसायटी, विश्वस्त संस्था, न्यास तसेच सेवा पुरवणाऱ्या सर्व आस्थापनांचा समावेश होतो. यामध्ये वाणिज्यिक, औद्योगिक, शैक्षणिक, करमणूक, आरोग्यविषयक सेवा, आर्थिक कार्य, उत्पादन, पुरवठा, विक्री, वितरण तसेच दवाखाने, नर्सिंग होम्स, क्रीडा संकुले, खेळांची ठिकाणे व दळणवळण सेवा पुरवणाऱ्या आस्थापनांचा समावेश आहे.संबंधित नियोक्ता किंवा आस्थापना प्रमुख यांची ही कायदेशीर जबाबदारी असून समितीची नोंदणी न केल्यास ५० हजार रुपये पर्यंत दंड आकारण्यात येईल. दंडानंतरही कार्यवाही न झाल्यास दुप्पट दंड तसेच परवाना रद्द करण्याची तरतूद आहे.शासनाने निर्धारित केलेल्या तपासणीसूचीप्रमाणे तपासणी करण्यात येणार असून त्रुटी आढळल्यास POSH Act 2013 च्या कलम २६ नुसार दंडात्मक कारवाई होईल, असेही अविनाश मगर यांनी स्पष्ट केले आहे.

# ग्रंथालय चळवळीच्या प्रश्नांसाठी पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करणार

**सांगोला (कटूसत्य वृत्त):** महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीसमोरील अडीअडचणी व विविध ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी विधानसभेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून ग्रंथालय क्षेत्राला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन सांगोला विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिले.

दि. २९ मे २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ तसेच सांगोला तालुका ग्रंथालय संघाच्या वतीने आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची भेट घेण्यात आली. यावेळी ग्रंथालय चळवळीसमोरील विविध समस्या, अनुदानातील अडचणी, कर्मचारी प्रश्न, ग्रंथालयांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या योजनांची अंमलबजावणी आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी ग्रंथालय चळवळीचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्व अधोरेखित करत विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करू, असे सांगितले. तसेच राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या समवेत महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक भूमिका घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या भेटीप्रसंगी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष ग्रंथमित्र गुलाबराव पाटील, सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक अमोघसिद्ध कोळी, सांगोला तालुका ग्रंथालय संघाचे अध्यक्ष हरिदास घोडके, प्रमुख कार्यवाह अशोक व्हटे उपस्थित होते.

तसेच सांगोला तालुका ग्रंथालय संघाचे पदाधिकारी राजेंद्र इंगोले, औदुंबर काळे, बिरुदेव काळे, रणजित भगत, विजय जगताप, रणजित भंडारे, आनंदा ढोले, राम जगताप, दत्तात्रय पाटील, सतीश इंगवले आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रंथालय चळवळीच्या प्रश्नांबाबत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिलेल्या आश्वासनामुळे ग्रंथालय क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

# ग्रामविकास भवनातून ग्रामीण प्रशासनाला मिळणार नवी दिशा- जयकुमार गोरे

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** खारघर, नवी मुंबई येथे उभारण्यात आलेल्या ग्रामविकास भवन या शासकीय इमारतीची आज ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी पाहणी केली. ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रशासकीय समन्वय तसेच प्रशिक्षण उपक्रमांसाठी हे संकुल महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे.

यावेळी ग्रामविकास भवनातील विविध प्रशासकीय विभाग, प्रशिक्षण कक्ष, बैठकींसाठी उपलब्ध सुविधा तसेच इतर पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील विकासकामांना अधिक गती देण्यासाठी सक्षम व आधुनिक प्रशासकीय यंत्रणा उभारणे आवश्यक असून, त्यादृष्टीने ग्रामविकास भवनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.



ग्रामीण विकास विभागाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता, समन्वय आणि कार्यक्षमता निर्माण व्हावी, यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. राज्यातील ग्रामविकासाशी संबंधित विविध उपक्रम, प्रशिक्षण प्रक्रिया आणि प्रशासकीय नियोजन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामविकास भवन हे केंद्र उपयुक्त ठरेल, असा विश्वास यावेळी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.